रूपरेषा

Synopsis

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"नांदेड आणि औरंगाबाद जिल्ह्याचा औद्योगिक विकासाचा तौलनिक अभ्यास" (२०१३ ते २०२३)

वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्र विद्याशाखे अंतर्गत 'वाणिज्य' या विषयातील पीएच.डी पदवी प्राप्तीसाठी संशोधन कार्याचा आराखडा.

:: संशोधक ::

कोकरे हर्षकुमार विश्वनाथ

(एम.कॉम)

:: मार्गदर्शक ::

डॉ. एस.के.खिल्लारे

(एम.कॉम, पीएच.डी)

प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख

महात्मा गांधी महाविद्यालय

अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर.

:: संशोधन केंद्र ::

वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्र संकुल

स्वा.रा.ती मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

सन २०२२

प्रस्तावना :

भारताचा विकासात शेती व्यवसायाला जशी विशेष महत्त्व आहे त्याचप्रमाणे किंबहुना त्यापेक्षा अधिक महत्त्व अर्थव्यवस्थेच्या आधुनिक करणार औद्योगिकीकरणा आहे औद्योगिकरण म्हणजे आर्थिक विकास होईल असे मानले जाते देशात आर्थिक प्रगती म्हणजे निरनिराळ्या घटकावर अवलंबून राहते त्यापैकी औद्योगिकीकरणा हा महत्त्वाचा घटक आहे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत इतर घटकांच्या तुलनेत औद्योगिकीकरणा खूप जास्त महत्त्व आहे. कारण औद्योगिकीकरणा वेग वेगावर आर्थिक विकासाची गती निश्चित केली जाते. किंबहुना एखाद्या देशाचा आर्थिक विकास आजमावण्यासाठी एक प्रमुख मापदंड म्हणून ही औद्योगिकीकरणा उल्लेख करता येईल.[१]

औद्योगिकीकरणामुळे देश हे अतिविकसित झाले आहे. औद्योगिकीकरणा उल्लेख करता येईल औद्योगिकीकरणा मुळे अनेक देश हे अतिविकसित झाले इंग्लंड मध्ये औद्योगिक क्रांती सर्वप्रथम झाली व नंतर अमेरिका, रशिया, फ्रान्स, जर्मनी, जपान इत्यादी राष्ट्रांनी औद्योगिकीकरण ही आर्थिक विकासाची गुरुकिल्ली आहे, असे गृहीत धरून औद्योगिकरणाला चालना दिली. उद्योगांचा पाया विस्तृत केला आणि पाहता त्यांची उद्योगाचा क्षेत्रातील झेप थक्क करून सोडणारी अशी झाली. परिणामतः जगातल्या विकसनशील देशांवर याचा प्रभाव पडला व त्या दोघांनीही औद्योगीकीकरण झाल्याशिवाय आर्थिक विकास संभव नाही असा विचार करून औद्योगिकरणाला चालना देण्यासाठी देण्याचा प्रयत्न केला.[२]

भारताचा औद्योगिक विकासाला चालना व गती पंचवार्षिक योजनेच्या काळात मिळाली आणि स्वयंचलित व स्वावलंबी औद्योगिक विकासाचा पाया घातला गेला नियोजनात निश्चित केलेल्या दिशा औद्योगिक विकास करण्याकरिता औद्योगिक धोरणात अनुसरून उद्योग धंद्यात वाढीचे अग्रक्रमान ठरविण्यात आले आहे.[३]

औद्योगिकिकरणा बाबत १९३८ सालापासून जगातील राष्ट्रांच्या श्रेणीमध्ये बदल झालेला दिसतो. नंतरच्या १९३८ काळात अमेरिका व कॅनडा ही राष्ट्रे औद्योगिक क्षेत्रात युरोपातील राष्ट्रांच्या पुढे गेली आहेत. औद्योगिक क्षेत्रातील प्रगत तिच्या दृष्टीने, म्हणजेच १९५६ - ५८ मधील सरासरी वार्षिक दरडोई उत्पादन निर्मिती मूल्याच्या अनुषंगाने वा उत्पादक तेच्या दृष्टीने, जगातील सर्व राष्ट्रांचे चार श्रेणीत वर्गीकरण करता येईल. प्रथम श्रेणी उत्तर अमेरिका, स्विझर्लंड, स्वीडन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड ह्या राष्ट्राचा समावेश होतो. तेथील दरडोई उत्पादननिर्मित मूल्य प्रति वर्षात एक हजार डॉलर होऊन अधिक आहे. दुसऱ्या श्रेणीत युनायटेय किंग्डम, फ्रान्स, नॉर्वे, डेन्मार्क, बेज्लीयम, पश्चिम जर्मनी, नेदर्लड्स, व्हेनेइवेला, रशिया, इस्त्रायल, चेकाकेस्लोव्हाकीया, अर्जेटीना, ऑस्ट्रिया, दक्षिण आफ्रिका, इटली, ह्या देशांचा समावेश होतो. त्यांचे दरडोई उत्पादन निर्मित मूल्य वर्षात ३०० डॉलरून अधिक आहे ग्रीस मेक्सिको जपान इजिप्त श्रीलंका गाना अल्जेरिया ही राष्ट्रीय तिसऱ्या श्रेणीत येतात कारण त्याचे उत्पादन निर्मित मूल्य वर्षे १०० ते २९९ डॉलर आहे ब्रह्मदेश, भारत, चीन, इंडोनेशिया पाकिस्तान, केनिया, नायजीरिया, केलीव्हिया व थायलंड यांचे दरडोई उत्पादन निर्मित मूल्य वर्षात १०० डॉलरपेक्षा कमी असल्याने त्याची समावेश चौथ्या श्रेणीत करता करावा लागतो.[४]

भारताच्या आधुनिक औद्योगिक विकासाची सुरुवात मुंबई येथे सण १८५४ सुती कापड गिरणीच्या स्थापनेपासून झाली या कारखान्याच्या स्थापनेत भारतीय भांडवल आणि भारतीय व्यवस्थापन हे प्रमुख घटक होते. १८५५ मध्ये कोलकत्याजवळ हुगळी व्हॅलीमध्ये ज्युट (दोरी) मिलच्या स्थापनेपासून उद्योगाची सुरुवात झाली ज्यामध्ये भांडवल आणि व्यवस्थापन हे दोन्ही विदेशी होते कोळसाखान उद्योग प्रथम १७७२ मध्ये रानीगंज (पश्चिम बंगाल) येथे सुरू झाला पहिली रेल्वे १८५४ मध्ये सुरू झाली जमशेदपूर (झारखंड राज्य) हे येथे १९०७ मध्ये टाटा आयर्न अँड स्टील प्लांटची स्थापना करण्यात आली. यानंतर सिमेंट, काच, साबण, रसायन, ताग, साखर आणि कागद इत्यादी अनेक मोठे, मध्यम

आणि लघु उद्योगांना कारखान्यांना युनिसची स्थापना स्वातंत्र्यपूर्वी औद्योगिक विकास किंवा उत्पादन पुरेशी नव्हतेच आणि त्याचा विविधता ही नव्हती.[५]

भारतीय अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचे औद्योगिक उत्पादन दृष्ट्या महत्त्वाचे योगदान आहे भारत वस्तू निर्मित शेतात महाराष्ट्रातील वस्तू निर्मिती क्षेत्र पुरेशा हिस्सा आहे. २००८ च्या या वर्षात विचार केल्यास भारतातील वस्तू निर्मिती क्षेत्रातील औद्योगांपेक्षा एकूण १२.५ टक्के ग्रामीण महाराष्ट्रातील होता आणि हे सर्वाधिक प्रमाण होते. तसेच उत्पादन भांडवलाचा वाटा १५.४८% उत्पादनाचे प्रमाण १८.४८ टक्के मूल्यवर्धित मधील वाटा २३.२६ % आणि औद्योगिक क्षेत्रात रोजगाराचे प्रमाण जवळपास १२% इतके होते यावरून राज्याची औद्योगिक विकासाची स्थिती निर्देशनास येते.

मराठवाडा विभाग पूर्वी हैदराबाद स्टेट चा एक भाग होता तत्कालीन हैदराबाद सरकारने १९३० मध्ये उद्योग विभाग सुरू केला परंतु या विभागात मराठवाड्यातील जिल्ह्याचा औद्योगिक साकडे फारसे लक्ष दिले नाही स्वातंत्र्यपूर्वी काळात औद्योगिक दृष्ट्या मराठवाडा विभाग दुर्लक्षित राहिला होता साधारणता १९३२ नंतर मराठवाड्यातच औद्योगिक उद्योग धंद्यांना उभारणीला सुरुवात झाली ती दिसते आज मराठवाड्याच्या औद्योगिकरणाला जवळजवळ 50 वर्षे जास्त काळ झालेला आहे.[६]

सध्या औरंगाबाद शहर हे मराठवाड्याचे केंद्रबिंदू असून आशिया खंडात सर्वाधिक झपाट्याने प्रगत झालेली शहर समजले जाते आता औरंगाबाद सोबतच जालना नांदेड आणि लातूर जिल्ह्यातही उद्योगाचा विस्तार वाढला आहे परंतु अजूनही परभणी जिल्हा उस्मानाबाद जिल्हा बीड या जिल्ह्यातील औद्योगीकरण पुरेशी झाले नाही.

राज्याला प्रगतीच्या वाटेवर पुढे नेण्यासाठी शिक्षण आरोग्याच्या सुविधा बरोबर अविकसित भागात गुंतवणूक करणे गरजेचे आहे मराठवाड्यातील अनेक उद्योग प्रकल्प पूर्ण आहेत ते तातडीने पूर्ण होणे आवश्यक आहे इतर

उद्योगाबरोबर मराठवाड्याचा विकास झाल्या तर मराठ्याची संतुलित विकास साधला जाईल.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनच औद्योगिक क्षेत्रात ही राज्य आघाडीवर आहे मराठवाड्यातील उद्योग क्षेत्र आजही नव्या उद्योगाची भर पडली असली तरी देखील मराठवाड्यातील अनेक उद्योग बंद पडत आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही औरंगाबाद मध्ये देखील औद्योगिक विकास क्षेत्रातील अनेक छोटे-मोठे उद्योग बंद पडत आहेत उद्योजक्ता व व्यापाराला मराठवाड्यात अनुकूल वातावरण आहे असले तरी औद्योगिक विकासाला चालना देणे इथे राजकीय दृष्ट असमर्थ ठरले आहे.[१०]

औद्योगिकीकरण म्हणजे काय ? :

औद्योगीकरण ही एक व्यापक स्वरूपाची संकल्पना आहे औद्योगीकरण म्हणजे नेमके काय ते सांगणे तसे कठीण आहे बऱ्याचदा उत्पादन क्षेत्र सुधारणा घडवून उत्पादन वाढीने म्हणजे औद्योगीकरण एवढ्या संकुचित अर्थाने ही संज्ञा वापरली जाते तसेच उत्पादन क्षेत्रात अधिक अधिक भांडवल वापर करणे म्हणजे औद्योगिकरण होय असेही म्हटले जाते तथापि औद्योगीकरण या संज्ञेत याशिवाय इतर अनेक घटकाचा अंतर्भाव होतो नव्या तंत्रज्ञानचा स्वीकार नवीन उद्योगाची स्थापना उद्योगांची वाजवीकरण शास्त्रशुद्ध व्यवस्थापन आदी बाबीचा समावेश औद्योगिकीकरणात करता येईल.[१०]

औद्योगिकीकरणाच्या व्याख्या :

रोझन्स्टाईल शेडन :

यांच्या मते "उत्पादन क्षमता वाढविणारी प्रक्रिया म्हणजे औद्योगीकरण होय".

पॉल एम. स्विझी :

यांच्या मते उत्पादन क्षमता निर्माण करण्याच्या आणि नवीन उत्पादन केंद्र निर्माण करण्याच्या प्रक्रियेस औद्योगीकरण असे म्हणतात.

पै-फँग-चँग :

यांच्या मते निरनिराळे उत्पादनफल व बदल घडविनारी प्रक्रिया म्हणजे औद्योगीकीकरण होय.

ए.एच.हॅनसन :

यांच्या मते "उत्पादन प्रक्रियेत अधिक भांडवलाचा वापर करणे व त्याद्वारे कामगाराच्या कार्यक्षमतेत वाढ घडवून आणणे म्हणजे औद्योगीकरण होय". थोडक्यात औद्योगीकरण पुढील बाबीचा/घटकांचा समावेश होतो

१) आधुनिक यंत्रे व तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे.

२) व्यवस्थापनेच्या आधुनिक व शास्त्रीय पद्धतीचा वापर करणे.

३) आधुनिक प्रकारच्या उद्योगसंस्था सुरू करणे.

४) भांडवलाचा योग्य प्रमाणात वापर करून उत्पादन घटकांची उत्पादन क्षमता वाढविणे.

५) नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळणे.

६) उत्पादन प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या घटकाचा पर्याप्त वापर करणे.

७) उत्पादन प्रक्रियेत बदल करून उत्पादन खर्चात घट करणे.

८) उद्योगाची वाजवीकरण स्थानिक करण व विशेषीकरण करणे.

९) कच्च्यामाल इंधन उत्पादन सामग्री यामध्ये परिस्थितीनुसार बदल करणे.

१०) उत्पादन प्रक्रिया विक्री व्यवस्था व्यवस्थापन परिस्थितीनुसार बदल करणे.

इत्यादी वरील सर्व घटक औद्योगिकीकरणात समाविष्ट होतात.

समस्या सूत्रण (**Statement of Problems) :**

महाराष्ट्र तुलनेत मराठवाड्यात अनेक समस्या आहेत. उदा. दारिद्र्य, बेकारी, लोकसंख्या, सुशिक्षित बेरोजगारी, जलसिंचनाच्या अपुऱ्यासुविधा, विषमता इत्यादी होय. त्यामुळे महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा आजही औद्योगिक दृष्ट्या मागासलेला विभाग आहे. कारण आजच्या डिजिटल युगात ही पाहिजे त्या प्रमाणात मराठवाड्याच्या औद्योगिक विकास झालेला नाही. जालना आणि औरंगाबाद जिल्हा सोडला तर इतर जिल्ह्यात औद्योगिकीकरणाचा विकास पाहिजे त्या प्रमाणात झालेला नसल्याचे निर्देशनास आली आहे.

संशोधनाचे महत्त्व :

महाराष्ट्रातील मागासलेल्या प्रदेशाचा जलद व समतोल प्रमाणात औद्योगिक विकास करण्याचे प्रयत्न होत आहेत. औद्योगिक उत्पादनातील उत्पादन घटक जमीन, जागा, मजूर, यंत्रसामुग्री, भाग भांडवल, व संघटन याची वृद्धी होत आहे. नवीन उद्योजकांना व व्यवसायिकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या योजनेचे व सवलतीची संधी उपलब्ध केली जात आहे. यातून उद्योगांना उभारणी मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच महाराष्ट्रातील मागासलेल्या प्रदेशांचा आर्थिक

विकास जलद गतीने करण्यासाठी व्यापक स्वरूपात नियोजन औद्योगिक प्रयत्न करण्यात येत आहेत. म्हणून नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचे योग्य मूल्यमापन होण्यासाठी, समस्या जाणण्यासाठी व उपाय सुतविण्यासाठी या अभ्यासाचे महत्त्वपूर्ण योगदान असणार आहे.

महाराष्ट्रात औद्योगिक विकासाचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रात असले तरी उद्योगजकांचा ओढा मात्र मुंबई, पुणे यासारख्या सर्वार्थाने विकसित भागातच असतो. त्या तुलनेत मराठवाडा भाग मात्र काहीसा दुर्लक्षित राहतो. मराठवाडा विभागात औद्योगिक विकासाचा प्रादेशिक असमतोल दिसून येतो, त्या अनुषंगाने मराठवाड्यातील नांदेड व औरंगाबाद जिल्ह्याची एकूण विश्लेषण होणे गरजेचे असल्याने सदर अभ्यासासाठी अभ्यासविषयाची गरज लक्षात घेऊन विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधनपद्धतीचा वापर करून संशोधन विषयाची विभिन्न पेलू स्पष्ट केले आहेत.

संशोधन विषयाची निवड :

मराठवाड्यातील नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील उत्पादित वस्तूंमध्ये वापरण्यात येणारी कच्च्या मालाची व्यवस्था व त्यापासून मिळणाऱ्या उत्पादनाची विक्री व पुरवठा हा समाजामध्ये कशाप्रकारे होतो व त्यामुळे समाजावर कशाप्रकारे परिणाम होतो व उत्पादनाचा फायदा समाजातील तळागाळातील जनतेला कसा होतो आणि तेथील रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध होतील त्यामुळे रोज बेरोजगारी प्रश्न कसा सुटतो, यासाठी मी स्वतः विषयाची निवड केली आहे.

तसेच नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यात औद्योगिक विकासाची स्थिती कशी आहे, तसेच त्यांच्यात कोणकोणते ते साम्य आहे हे पाहण्यासाठी मी एक संशोधक नात्याने मी या विषयाची निवड केली आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी "नांदेड आणि औरंगाबाद जिल्ह्याचा औद्योगिक विकासाचा तौलनिक अभ्यास" याविषयीची निवड केली आहे. प्रस्तुत संशोधन औद्योगिक विकास आणि परिणाम या संबंधित असून तो वर्तमान काळाशी निगडित आहे. संशोधनासाठी नांदेड आणि औरंगाबाद जिल्ह्याची निवड केली आहे. तथ्य संकलनासाठी पुढील साधनाचा वापर केला आहे.

१) प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पातील उद्योगांची संबंधित व्यक्तीशी चर्चा करून प्रश्नावली भरून उद्योगाच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी प्राथमिक माहिती जमा करण्यात येणार आहे.

२) दुय्यम स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनात माहिती व आकडेवारी दुय्यम स्त्रोताद्वारे प्राप्त केली जाणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मराठवाड्यातील औद्योगिककार्यालय, सांख्यिकी कार्यालय, तसेच दैनिक कार्यालय, शासनाचे विविध अहवाल, विविध विद्यापीठ संशोधन केंद्राच्या ग्रंथालये, संग्रहित केलेले दुर्मिळ ग्रंथ, साप्ताहिके, मासिके, दैनिक बाइंडिंग केलेले असंख्य अंक, इतर विविध प्रकारची वृत्तपत्राचा आधार घेण्यात येणार आहे. तसेच विविध संकेत स्थळाचा वापर सुद्धा संशोधन कार्य केला जाणार आहे.

सांख्यिकीय पद्धत :

संकलित तथ्याची विश्लेषण आणि अर्थ बोधनासाठी विविध सांख्यिकीय साधनाचा वापर संशोधक करणार आहे

आलेख:

संकलित साधन सामुग्रीचे स्तंभालेख, वृत्तालेख याद्वारे माहितीची मांडणी करण्यात येणार आहे.

नमुना निवड :

संशोधक हा संशोधनासाठी एकूण ५00 नमुना निवड करणार व माहितीचे संकलित करणार आहे.

संशोधन साहित्याचा संक्षिप्त आढावा :

संशोधनाशी संबंधित असलेल्या संशोधकांनी औद्योगिक विकासाशी निगडित असलेल्या विषयाचा अभ्यास करून जे संशोधन साहित्य निर्माण केले आहे त्याचा संक्षिप्त साहित्याच्या आढावा यात घेण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक विकासामुळे झालेल्या आर्थिक व सामाजिक विकासाचा अभ्यास करणे.

२) नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या उद्योगांचा अभ्यास करणे.

३) नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक विकासाच्या निर्देशाकांचा अभ्यास करणे.

४) नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील तोट्यात चालणारे व बंद पडलेल्या उद्योगांचा समस्याचा अभ्यास करणे.

५) नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचा तौलनिक अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

१) नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक विकासामुळे वाणिज्य साधनामध्ये वाढ झाली आहे.

२) नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक विकासामुळे आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळाली आहे.

३) औद्योगिक विकासामुळे रोजगारात वाढ होऊन बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे.

४) नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील आजारी व तोट्यात चालणाऱ्या उद्योगांना वित्तीय आर्थिक सहाय्य व इतर मूलभूत गरजा शासनाकडून पुरविल्या जातात.

संशोधन विषयाची मर्यादा/व्याप्ती :

महाराष्ट्र औद्योगिक विकास दृष्टिकोनातून विचार करता संपूर्ण राज्यात उद्योगाचे जाळे तयार झाली आहे आज संपूर्ण राज्यात 233 लहान मोठे औद्योगिक क्षेत्र महामंडळांनी निर्माण केली आहेत. मात्र अभ्यासाच्या सोयीनुसार इतका व्यापक म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रातील मराठवाड्याचा नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचा तौलनिक अभ्यास या संशोधन कार्यात केला आहे. मराठवाड्यातील इतर जिल्ह्याचा औद्योगिक विकासाचा अभ्यास केला जाणार नाही, तसेच हा अभ्यास सन २०१३ ते २०२३ या दहा वर्षाची संबंधित आहे.

प्रकरण १ ले

प्रस्तावना :

या प्रकरणांमध्ये संशोधक संशोधन विषयाची प्रास्ताविक माहिती व संशोधन पद्धती विषयी माहिती सादर करणार आहे.

प्रकरण २ रे

संशोधन साहित्याचा संक्षिप्त आढावा :

या प्रकरणात संशोधक संशोधनासंबंधातील साहित्याचा आढावा घेणार आहे.

प्रकरण ३ रे

नांदेड जिल्ह्यातील औद्योगिक स्थितीचा आढावा.

प्रकरण ४ थे

औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक स्थितीचा आढावा.

प्रकरण ५ वे

नांदेड व औरंगाबाद जिल्ह्याचा औद्योगिक स्थितीचा तौलनिक अभ्यास

प्रकरण ६ वे

तथ्य संकलन व विश्लेषण

प्रकरण ७ वे

निष्कर्ष आणि शिफारशी

(संदर्भसूची)

संदर्भ ग्रंथ :

१) प्रा. रायखेलकर आणि डॉ. दामजी, 'औद्योगिक अर्थशास्त्र', विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, जून २०१४ पृ. क्र. ०१.

२) प्रा. रायखेलकर, 'औद्योगिक अर्थशास्त्र', विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, जून १९९९, पृ. क्र. १११.

३) मराठी विश्वकोष, भारतातील औद्योगिक विकास.

४) औद्योगिकीकरण, विकिपीडिया.

५) संकेतस्थळ.

६) डॉ.बी.डी. इंगळे, 'औद्योगिक अर्थशास्त्र', अरुणा प्रकाशन, लातूर, १५ ऑगस्ट २०१२ पृ.क्र. ८४.

७) महाराष्ट्र गॅझेट नांदेड जिल्हा भाग १ दर्शनीक विभाग पर्यट सांस्कृती कार्य विभाग महाराष्ट्र शासन मुंबई, द्वितीय आवृत्ती, पृ.क्र. ४०१.

८) दैनिक आनंदनगरी दिनांक १० एप्रिल २०१२.

९) लोकराज्य मासिक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई ऑक्टोबर २०१२.

१०) कित्ता ०८.

११) प्रा. रायखेलकर आणि डॉ. दामजी, ' औद्योगिक अर्थशास्त्र', विद्या बुक्स पब्लिशेर्स औरंगाबाद जून २०१४ पृ. क्र.०२.

१२) कित्ता ०६, पृ.क्र. ४९.

१३) कित्ता ११, पृ.क्र. ०६.

मार्गदर्शक	संशोधक
डॉ. एस.के.खिल्लारे	कोकरे हर्षकुमार विश्वनाथ

(एम.कॉम, पीएच.डी)
प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय
अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर.